# शालेय पोषण आहार योजना

| अ.क्र. | परिक्षेत्राचे नाव व गुरनं व मुख्यालय सिआर क्रमांक | लोकसेवकाचे नांव, हुददा् व खाते | वर्ग | लाचेची रक्कम | कल्याणकारी योजनेचे नांव | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो. स्टे. लातूर ग्रामिण गु.र.नं. ३००४/१४ कलम ७, १३(१)(ड) सह १३(२)भ्र.प्र.अ. १९८८ दा. दिनांक ११/०२/२०१४ सिआर/१२२/लातुर/२०१४ | श्रीमती शोभा पिता रघुनाथसिंह बायस वय ४९ वर्ष व्यवसाय मुख्याध्यापिका, महानगर पालिका शाळा क्रमांक ६ शंकरपुरमनगर, कव्हा रोड लातूर तालुका व जिल्हा लातूर | ३ | १५००/- | **शालेय पोषण आहार योजना** | तक्रारदार यांनी शालेय पोषण आहार अंतर्गत अन्न शिजवुन दिले त्या आहाराचे खर्चाचे देयक वेळोवेळी पंचायत समिती लातूर येथे सादर केले त्या कामाचेबक्षीस म्हणुन आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांना १५००/- रु. लाचेची मागणी करुन लाच स्वीकारले आहे. |
| २ | पुणे परिक्षेत्र, सांगली ॲ.कॅ.विश्रामबाग पोलीस ठाणे, जि.सांगली, भाग-६, गु.र.नं. ४५२/२०१५, ला.प्र.का. कलम ७, १३ (१)(ड) सह १३(२) दि.०४/०९/१५ (सीआर/८५५/सांगली/१५) | गणेश राजाराम चोरमुले, वय-५२ वर्षे, परिविक्षा अधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय, प्रशासकीय इमारत, सांगली ( महिला व बाल विकास विभाग ) | ३ | रूपये १५००/- | **बाल संगोपन योजना** | तक्रारदार यांचे बाल संगोपन योजनेच्या अनुदानाचे चेक देण्याकरीता आलोसे यांनी १,५००/- रु. लाचेची मागणी करुन स्विकारली. |
| ३ | अमरावती परिक्षेत्र, अमरवती ॲ.कॅ.ब्युरो, पो. स्टे.राजापेठ, अमरावती (शहर) अप.नं. ३१७६/२०१५ कलम ७,१३(१)(ड) सह १३(२) ला.प्र.का.१९८८ दि.२७/११/१५ | सौ.विना साहेबराव लव्हाळे, वय ५३ वर्षे, मुख्याध्यापिका, म.न.पा.उच्च प्राथमिक मराठी शाळा, जेवडनगर, अमरावती, रा.प्रशांतनगर, पवन मेडीकलजवळ, किशोरनगर, अमरावती (सीआर/१११६/ अमरावती/२०१५) | ३ | रूपये २०००/- | **शालेय पोषण आहार योजना** | तक्रारकर्ता सचिव असलेल्या जय माता दी नावाचे बचत गटाकडुन म.न.पा.प्राथमिक शाळा, जेवडनगर, अमरावती येथील शालेय पोषण आहार मध्यान्ह भोजन योजनेच्या चेक मंजुर झाला होता. सदर चेक देण्याचे मोबदल्यात सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे यांना २००० रु. लाच रक्कम स्विकारल्यानंतर रंगेहाथ पकडण्यात आले. |
| ४ | नाशिक परिक्षेत्र, नाशिक ॲ.क.ब्युरो,, घोटी पोलीस ठाणे, गुरनं. ३०८६/२०१५ , भ्र टाचार प्रतिबंधक कायदा सन १९८८चे कलम७, १३(१)(ड) सह १३(२)प्रमाणे दिनांक १६/१२/२०१५ | चंद्रकांत दाजी गांगुर्डे, वय ४४, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा, पिंपळगांव मोर ता.इगतपुरी जि. नाशिक ( जिल्हा परिषद ) ( सीआर/११७५/नाशिक/२०१५) | ३ | रूपये ३०००/- | **शालेय पोषण आहार योजना** | तक्रारदार हया जिजामाता महिला बचत गटाच्या अध्यक्षा आहेत. त्यांना ग्रामपंचायत, पिंपळगांव मोर यांनी ठराव करुन जिल्हा परिषद शाळा, पिंपळगांव मोर या शाळेतील मुलांना शालेय पोषण आहार पुरवण्याचे काम दिले होते. त्याप्रमाणे त्यां जिल्हा परिषद शाळा, पिंपळगांव मोर येथील विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार पुरवित आहेत. त्यांनी पुरविलेल्या शालेय पोषण आहाराचे १०,०००/- रुपये बिल झाले होते. सदरचे बिल त्यांना मंजूर झाले असून त्या रक्कमेचा चेक त्यांना प्राप्त झाला होता. त्यांना त्यांचे बिलाचा चेक मिळाल्याबद्यल शाळेचे मुख्याध्यापक चंद्रकांत दाजी गांगुर्डे यांनी त्यांचेकडे ३०००/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारले |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | नाशिक परिक्षेत्र, नंदुरबार ॲ.कॅ.ब्युरो नवापूर पोलीस ठाणे गुरनं. ३००९/२०१६ , भ्र टाचार प्रतिबंधक कायदा सन १९८८चे कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे दिनांक ०२/०३/२०१६ | रश्मी सुधाकर सोनार, वय २६, मुख्याध्यापिका व गृहपाल, कस्तूरबा गांधी निवासी शाळा व विद्यालय, वाकीपाडा ता.नवापूर जि. नंदूररबार ( शिक्षण विभाग ) ( सीआर/२८४/नदुरबार /२०१६) | ३ | १४,०००/- रुपये | **शालेय पोषण आहार योजना** | तक्रारदार यांची मावशी हया कस्तूरबा गांधी निवासी शाळा व विद्यालयास सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत शाळेस ( वस्तगृहास ) भाजीपाला पुरवितात. त्यांचे माहे सप्टेंबर २०१४ ते डिसेंबर २०१५ या कालावधीत पुरविलेल्या भाजीपाल्याचे बिल ९३,०५३/- रुपये झाले होते. सदरचे बिल मंजूर झाल्याने तक्रारदार यांच्या मावशी हया चेक घेण्यासाठी मुख्याध्यापिका सोनार यांचेकडे गेल्या असता चेक देण्याचे बदल्यात टक्केवारीप्रमाणे मुख्याध्यापिका सोनार यांनी त्यांचेकडे १४,०००/- रुपये लाचेची मागणी केली. तक्रारदार यांची मावशी मुकबधिर असल्याने त्यांचेवतील तक्रारदार यांनी तक्रार दिली. त्यानंतर मुख्याध्यापिका सोनार यांनी तक्रारदार यांचेकडे १४,०००/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारले |
| ६ | नांदेड परिक्षेत्र, नांदेड ॲ.कॅ.ब्युरो, मांडवी पो ठाणे गरनं ३००३/२०१६ कलम ७ लाप्रका १९८८ दिनांक २०/०४/२०१६ | अविला ज्योतीराम जाधव, वय ५१ वर्ष मुख्याध्यापिका जिल्हा परिषद शाळा ( जिल्हा परिषद विभाग ) ( सीआर/३२९/ नांदेड/२०१६ ) | ३ | १०००/- रुपये लाचेची मागणी | **शालेय पोषण आहार योजना** | मुळ तक्रारदार यांना शालेय पोषण आहार योजना अंतर्गत खिचडी शिजविल्याचे माहे ऑगष्ट २०१५ ते डिसेंबर २०१५ पर्यंतचे भाजीपाला व ईधन खर्चाची रक्कम दिल्याबददल व सदर कालावधीतील मानधनाची ५०००/-रु. रक्कम त्यांचे बॅक खात्यावर पाठविल्याबददल बक्षीस म्हणुन पंचासमक्ष १०००/-रु.लाचेची मागणी करुन स्वत: लाच स्विकारण्याचे मान्य केले म्हणुन गुन्हा. |
| ७ | नाशिक परिक्षेत्र, जळगाव ॲ.कॅ.ब्युरो, एमआयडीसी जळगांव पोलीस ठाणे गुरनं. ३००७/२०१६ , भ्र टाचार प्रतिबंधक कायदा सन १९८८चे कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे दि. ०२/०५/१६ | सौ.आशा संजय तेजकर, वय ४८, पर्यविक्षिका, एकात्मीक बाल विकास सेवा योजना, जिल्हा परिषद, जळगांव ( जिल्हा परिषद विभाग ) ( सीआर/३६८/ जळगाव/२०१६ ) | ३ | ३६,२००/- रुपये | **शालेय पोषण आहार योजना** | तक्रारदार यांच्या बचत गटाने एकात्मीक बाल विकास सेवा योजना अंतर्गत जिल्हा परिषदेच्या अखत्यारित असलेल्या ६ अंगणवाडयांना पुरक पोषण आहार पुरविलेला आहे. मागील ८ महिन्यात पुरविलेल्या आहाराचे बिल रक्कम रुपये १,७७,०००/- रुपये मंजूरीचा चेक देण्यासाठी आलोसे तेजकर यांनी तक्रारदार यांचेकडे बिलाचे टक्केवारीप्रमाणे ३२,५००/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारले |